REGISTERED No. B 3434

# अर्थ

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ६ | पुणें, बुधवार, तारीख १७ जुलै, १९४० | अंक २९

चुकीच्या ध्येयांना कवटाळून
आपल्या हातांनीं स्वतःच्या जीवनाचा
कोण्डमारा करणाऱ्या स्त्रियांचा
प्रश्न चित्रित करणारें
प्रमेयात्मक नवयुग चित्र

## लपण्डाव

निर्माते—बाबूराव पेंढारकर—मीनाक्षी वनमाला, बी. ए., बी. टी.
लेखक—आचार्य अत्रे —विनायक बाबूराव पेंढारकर
दिग्दर्शक—के. नारायण काळे—पवार साळवी.

जुलै अखेर रजतपटावर येणार

नवयुग चित्रपट लिमिटेडचा दुसरा बोलपट.
तयार होत आहे ✣ ले. श्री. वि. स. खाण्डेकर
दि.—विनायक.
भूमिका—मीनाक्षी, ललिता पवार, विनायक, साळवी, बाबूराव पेंढारकर.

प्रकाशक—पीअरलेस पिक्चर्स, मुंबई ४.

दि
## बँक ऑफ महाराष्ट्र, लिमिटेड

सर्व तऱ्हेचा बँकिंगचा व्यवहार केला जातो
बँकेची शेअर–विक्री चालू आहे


मुख्य कचेरी
लक्ष्मी रोड, पुणें.

मुंबई शाखा
दलाल स्ट्रीट, कोट

पुणें शाखा
डेक्कन जिमखाना

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

तुम्हांला रोज एक आणा वांचवितां येईल काय?




■ नाणें टाकलें तरच चालणारें घड्याळ आम्हीं आमचे विमेदारांस मोफत देतों.
■ रोज एक आणा वांचवून तुम्हांस रुपये ५५० पेक्षां अधिक रकमेची पॉलिसी घेतां येईल.
■ आमची रद्द झालेली पॉलिसी थकलेले हप्ते अगर व्याज भरावे न लागतां सुद्धां चालू करतां येतें.
■ कंपनीनें मागील मूल्यमापनांत विमेदारांस दर हजारीं ३० व ३६ असा बोनस जाहीर केला.

## दि ट्रस्ट ऑफ इंडिया अॅश्यु. कं. लि.
लक्ष्मी रोड पुणें २

अध्यक्ष : श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित
शाखा : मुंबई, नागपूर, ग्वाल्हेर, इंदूर, सोलापूर, सातारा, कोल्हापूर, बेळगांव, अहमदनगर वगैरे

# विविध माहिती

### रुपयाच्या बदली नोटा

एक आणि अर्धाच रुपयांच्या नोटा सरकारनें प्रसृत कराव्या, अशा सूचना सरकाराकडे अनेक ठिकाणांहून आल्या आहेत, त्यांचा सरकार काळजीपूर्वक विचार करीत आहे.

### युद्धकर्जरोख्यांची खरेदी

बिन व्याजाचे २५ लक्ष रुपयांचे हिंदी कर्जरोखे बडोदें सरकारनें घेतले आहेत.

### टाटा कंपनीचें डिव्हिडंड

३१ मार्च, १९४० अखेर संपलेल्या वर्षाकरितां टाटा आयर्न ॲन्ड स्टील कंपनीनें खालीलप्रमाणें डिव्हिडंड द्यावें, अशी डायरेक्टर बोर्डानें शिफारस केली आहे:—

| | |
|---|---|
| १ ले प्रेफरन्स भाग | प्रत्येक भागास ९ रु. |
| २ रे प्रेफरन्स भाग | „ „ ७ रु. ८ आ. |
| ऑर्डिनरी भाग | „ „ २५ रु. |
| डिफर्ड भाग | „ „ १४३ रु. १४आ. ७पै |

### म्हैसूरचें १९४०-४१ चें अंदाजपत्रक

१९४०-४१ मध्यें म्हैसूर सरकारास ४ कोटि, ३९ लक्ष रुपये उत्पन्न होईल असा अंदाज आहे. सरकारी लोखंड-पोलादाच्या कारखान्यास गेल्या वर्षी ९ लक्ष १२ हजार रुपये नफा झाला. सरकारी इतर ११ कारखान्यांस त्यांत गुंतविलेल्या २५ लक्ष रुपये भांडवलावर ८८½ हजार रुपये नफा सुटला.

### डॉलर रोख्यांबाबत रिझर्व्ह बँकेस तपशील द्या

ज्या रोख्यांचें मुद्दल, व्याज अगर डिव्हिडंड अमेरिकन डॉलर्समध्यें द्यावयाचें आहे, अशा रोख्यांची तपशीलवार यादी एका महिन्याचे आंत रिझर्व्ह बँकेकडे पाठवावी, असा डिफेन्स ऑफ इंडिया नियमाखाली सरकारनें हुकूम काढला आहे. ह्यानंतर रिझर्व्ह बँकेचे परवानगीशिवाय ह्या रोख्यांची वर्गावर्गी कोणीहि करतां कामा नये.

### फॅक्टरी ॲक्टाखालील कारखाने

मुंबई प्रांतांत १९३८ सालीं २,४९१ कारखाने चालू होते, त्यांत १९३९ मध्यें ६२५ ची भर पडून एकूण कारखान्यांची संख्या ३,१२० झाली. फॅक्टरी ॲक्ट लागू पडणाऱ्या कारखान्यांची संख्या ६५० नें वाढली. हातमागांचे संख्येंत विशेष भर पडली. स्त्री-कामगारांची संख्या ९९४ नें कमी झाली, त्याचें मुख्य कारण कपास कापडाच्या गिरण्यांत त्यांस मिळालेलें कमी काम, हें होय. कारखान्यांत एकूण १०,०२५ अपघात झाले, त्यांत एकूण १०,०८६ कामगारांस दुखापत झाली. १३२ कारखान्यांवर फॅक्टरी ॲक्टखाली दावे करण्यांत आले, त्यांत ९,१२१ रुपयांचा दंड वसूल झाला.

### जपानी सायकलींची निर्गत

जपान देश सायकलींच्या निर्गतीचे बाबतींत अग्रेसर होत चालला आहे. १९३९ सालीं जपाननें ४१ लक्ष ८५ हजार सायकली व त्यांच्या केम्स बाहेर पाठविल्या. ह्याच मुदतींत २२ लक्ष, ४० हजार टायर-ट्यूब्स; १३ लक्ष, १५ हजार सीट्स; ११ लक्ष, ७४ हजार रिम्स; १२ लक्ष चिमटे व हँडलबार; ५ लक्ष, ८६ हजार स्पोक्स; १४ लक्ष पॅडल व साखळ्या आणि ७८ लक्ष, १९ हजार इतर सुटे भाग ह्यांची जपाननें परदेशांत विक्री केली.

### जर्मनींतील विद्यार्थ्यांस पैसे पाठविण्यास मनाई

कलकत्ता विश्वविद्यालयाची शिष्यवृत्ति मिळत असलेला एक विद्यार्थी जर्मनीमध्यें आहे, त्यास त्याच्या शिष्यवृत्तीचा शेवटचा हप्ता (५०० रु.) पाठविण्यास सवलत मिळण्यासाठीं तें विश्वविद्यालय प्रयत्न करीत आहे. जर्मनींत अभ्यास चालू ठेवण्यासाठीं हिंदी विद्यार्थ्यांस पैसे पाठविण्याची परवानगी देण्याचें हिंदुस्थान सरकारनें नाकारलें आहे.

### हैद्राबाद पायोनियर विमा कं. गुंडाळण्यांत येणार

हैद्राबाद पायोनियर ॲशुअरन्स कं. लि. गुंडाळण्यांत यावी, असा मुंबई हायकोर्टानें निकाल दिला आहे. ही कंपनी मुंबई येथें नोंदण्यांत आली होती, तथापि कंपन्यांच्या रजिस्ट्रारकडून कामास प्रारंभ करण्यास परवानगी कंपनीला मिळाली नव्हती. तरी कंपनीनें ब्रिटिश हिंदुस्थानांत विम्याचें काम चालू केलें. दुरुस्त विमा कायद्याप्रमाणें आवश्यक असलेलें डिपॉझिटहि तिनें ठेवलेलें नव्हतें. ताळेबंदांतील 'ऑर्गनायझेशन' खर्चाचा जिवगीकडील आकडा सालोसाल फुगत होता. हप्त्यांच्या उत्पन्नाशीं खर्चाचें बेसुमार प्रमाण पडत होतें. कंपनीच्या तात्पुरत्या लिक्विडेटरच्या हातीं केवळ ५२ रुपयेच आले.

### वीज कंपन्यांचें उत्पन्न

मेसर्स टाटा हायड्रो-इलेक्ट्रिक एजन्सीज लि. च्या व्यवस्थेखालील वीज कंपन्यांच्या, जून १९४० अखेर संपलेल्या वर्षाच्या उत्पन्नाचे आकडे खालीं दिले आहेत:—

| | रु. |
|---|---|
| टाटा हायड्रो इलेक्ट्रिक | ४१ लक्ष, ४६ हजार |
| आंध्र व्हॅली पॉवर | ४७ लक्ष, ५९ हजार |
| टाटा पॉवर | ७७ लक्ष |

### हिंदुस्थानांत मोटारी तयार होणार

मोटारगाड्या तयार करणारी एक कंपनी श्री. वालचंद हिराचंद ह्यांचे पुढाकारानें मुंबई येथें स्थापन होणार आहे. ह्या योजनेस किमान २½ कोटि रुपयांचें भांडवल लागेल. सर एम. विश्वेश्वरय्या ह्यांच्या मूळ योजनेचें हें फळ आहे.

### दररोज ११ कोटि रुपये खर्च

सध्या चालू असलेल्या युद्धावर ग्रेटब्रिटनचा दररोज सुमारें ११ कोटि रुपये खर्च होत आहे; उत्पन्न आणि खर्च ह्यामधील तफावत वाढत चालली असून लोकांस कराचा अधिक बोजा लवकरच उचलावा लागेल, असें ब्रिटिश फडणवीस पार्लमेंटांतील आपल्या भाषणांत १५ अब्ज रुपयांच्या खर्चास मंजुरी मागतांना म्हणाले.

### ओसाका

ओसाका ह्या जपानी शहरांत एकूण ७४,७०० कारखाने असून त्यांतील कामगारांची संख्या ५,३४,००० आहे.

### एका मैलास किती गॅलन ?

एका गॅलनला किती मैल जाते असा प्रश्न मोटारीस लागणाऱ्या पेट्रोल संबंधानें नेहमीं विचारण्यांत येतो. युद्धांत अलीकडे चिलखती गाड्या वापरल्या जातात, त्यांचे बाबतींत, एका मैलास किती गॅलन लागतात असा प्रश्न विचारणें आवश्यक होतें. दर मैलास चिलखती गाडीस सहा गॅलन पेट्रोल लागतें आणि तिच्यामध्यें तीनशें गॅलनांचा साठा असतो. पुन्हा पेट्रोल भरल्यावांचून चिलखती गाडी पन्नास मैलांपेक्षा अधिक जाऊं शकत नाहीं. जर्मनीच्या पेट्रोलच्या साठ्यांवर ब्रिटिश विमानांचे हल्ले कां होत आहेत ह्याचें रहस्य ह्यावरून ध्यानांत येईल. जी मोठ चिलखती गाड्यांची तीच कमी प्रमाणांत लढाऊ विमानांची आहे.

अनुक्रमणिका

| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ३३८ | मध्यें गुरफलेल्या फळांचा खप | |
| २ युद्धाचा सहकारी चळवळीवर परिणाम ... | ३३९ | ५ वैंबे को. कार्टर्ली | ३४२ |
| ३ मुंबई प्रांतांतील शिक्षणाची प्रगति ... ... | ३४० | ६ बँक ऑफ इंडिया लि. | ३४२ |
| ४ स्फुट विचार ... | ३४१ | ७ ब्रिटिश बँकांचें धोरण व युद्धपरिस्थिति ... | ३४३ |
| हिंदुस्थानांतील अमेरिकन कर्जरोख्यांची मोजदाद— | | ८ ग्रेट सोशल कं. ... | ३४३ |
| इंग्लंडचा वाढता युद्ध खर्च— | | ९ आंतरराष्ट्रीय मजूर परिषदेचे ठराव ... | ३४४ |
| जर्मनांच्या कारवाया-फेडरल | | १० संपझालयें ... | ३४४ |
| कोर्टाच्या अधिकारांत वाढ— | | ११ जपानी खेळणीं ... | ३४५ |
| जवाहिराचा व्यापार-इंग्लंड- | | १२ कांहीं खेडेगांवी धंदे | ३४६ |
| | | १३ निवडक बाजारभाव | ३४७ |

# अर्थ

बुधवार, ता. १७ जुलै, १९४०

## युद्धाचा सहकारी चळवळीवर परिणाम

### मुंबई प्रांतांतील परिस्थितीचें सिंहावलोकन

चालू युद्धास प्रारंभ होतांक्षणींच बाजारभाव चढूं लागले. विशेषतः ताग, कपास आणि गळिताचीं धान्यें ह्यांचा बाजारभाव वाढला. गेल्या महायुद्धाचे वेळीं ज्याप्रमाणें बाजारभाव चढत गेले, तसेंच आतांहि होईल असें वाटूं लागलें आणि ह्या अपेक्षेचे जोरावर अनेक योजनांचा विचार चालू झाला. पोलंडमधील जर्मनांची मोहीम संपल्यावर कांहीं दिवस थोड्या शांततेचे गेले आणि बाजारभावांची चढती कमान उतरूं लागली. डिसेंबर, १९३९ च्या दुसऱ्या आठवड्यांत किंमतींत पुनः वाढ होऊं लागली, ती महिनाभर टिकली. तथापि, जानेवारी अखेर भाव पुनः खालीं येऊं लागले आणि त्यानंतर त्यांत बरीच आंदोलनें झालीं. तथापि बाजारभाव उतरत जाण्याची प्रवृत्ति कायम राहिली. आगबोटींची ये-जा पूर्वीप्रमाणें चालू रहाणें आतां शक्य न झाल्यानें, निर्गतीवर सरकारनें बंधनें घातल्याकारणानें आणि युरोपांतील देशांशीं चालणारा हिंदुस्थानचा व्यापार बंद पडल्याकारणानें हिंदी मालास मागणीहि कमी झाली. पिकें तयार झाल्यानंतर कांहीं आठवडेच फक्त बाजारभाव तेजीचे राहिले आणि त्याचा फायदा थोड्या शेतकऱ्यांसच मिळूं शकला. कांहीं जणांनीं भाव आणखी कडकतील म्हणून वाट पाहिली, तथापि त्यांचे पदरांत निराशाच आली. मुंबई प्रांताच्या कित्येक भागांत दुष्काळ पडल्यामुळें आणि इतर कांहीं ठिकाणीं पीक नेहेमीप्रमाणें न आल्यामुळें, एकूण उत्पादनच कमी झालें होतें. शेतकऱ्यांस बाजारभावांच्या वाढीचा फायदा न मिळण्यास ह्या गोष्टीहि कारणीभूत झाल्या.

### बाजारभाव पुरेसे वाढले नाहींत

मुंबई प्रांतांतील सहकारी चळवळीवर सध्या चालू युद्धाचा काय परिणाम झाला आहे, ह्याचें विवेचन श्री. वैकुंठराय मेहता ह्यांनीं इंडियन कोऑपरेटिव्ह रिव्ह्यूच्या ताज्या अंकांतील आपल्या लेखांत उत्कृष्टपणें केलें आहे. चालू युद्धाचा शेतकऱ्यांचे परिस्थितीवर होणारा परिणाम लक्षांत घेतांना गेल्या महायुद्धाच्या वेळेचा अनुभव उपयोगास सध्या येत नाहीं; कारण आतां तेव्हांप्रमाणें बाजारभावच वाढलेले नाहींत, असें ते आपल्या लेखांत म्हणतात. बाजारभाव सुधारल्यामुळें शेतकऱ्यांचे पदरांत ज्यास्त पैसे पडले तर सहकारी सोसायट्यांची वसुली होण्यास सहाय होईल; परंतु आतांपर्यंतचा अनुभव विशेष उत्साहकारक नाहीं. श्री. वैकुंठराय ह्यांनीं, युद्धाच्या पहिल्या सात महिन्यांतील बाजारभाव दर्शविणारा तक्ता आपल्या लेखास जोडला आहे, तो उद्बोधक आहे:—

मुंबई प्रांतांतील बाजारभाव

| | | अ तांदूळ | ब भुइमुग | क कपास | ड गूळ |
|---|---|---|---|---|---|
| | | रु. | रु. | रु. | रु. |
| ऑगस्ट | १९३९ | ३–४–० | ३-११-० | ८५ | २३ |
| सप्टेंबर | १९३९ | ३–४–० | ३-११-० | ८९ | २४ |
| ऑक्टोबर | १९३९ | ३–४–० | ३-१३-० | ९० | २४ |
| नोव्हेंबर | १९३९ | ३–६–० | ४–४–० | १०० | २४ |
| डिसेंबर | १९३९ | ३–६–० | ४-१५-० | १२० | २४ |
| जानेवारी | १९४० | ३–४–० | ५–०–० | १२५ | १७ |
| फेब्रुवारी | १९४० | ३–४–० | ४-११-० | १०८ | १६ |
| मार्च | १९४० | ३–४–० | ४–५–० | ९५ | १४ |
| १९३८-३९ | ची सरासरी | २-१२-० | ३–४–० | ६५ | २२ |

अ: १६ पायलींच्या प्रत्येक मणास
ब: ८२-२९ पौंडांच्या प्रत्येक मणास
क: ३९२ पौंडांच्या प्रत्येक बोजास
ड: ५ पौंडांच्या प्रत्येक पल्ल्यास

### व्याजाचे दरांत सवलत

व्याजाच्या बाबतींत सामुदायिक सवलत रजिस्ट्रारनीं कांहीं वर्षांपूर्वी दिली होती, ती आतां बहुतेक ठिकाणची काढून घेण्यांत आली आणि केवळ हिशेबीं वसुली न होतां खरीखुरी परतफेड व्हावी ह्याकरितां कर्जविषयक धोरणांत फरक करण्यांत आला. ह्या दोन्ही गोष्टींचाहि वसुलीवर परिणाम झाल्याविना राहिला नाहीं. शेतकऱ्यांस काटकसरीची सवय लावण्यास प्रस्तुत संधी चांगली आहे, असें सांगण्यांत आलें, परंतु ही संधी प्रत्यक्ष उपलब्ध झाली नाहीं. कारण शेतकऱ्यांच्या हातीं विशेष ज्यास्त पैसे आले नाहींत आणि जे कांहीं थोडे पैसे आले, त्यांचा विनियोग अनेक वर्षे वाढत आलेल्या कर्जफेडीकडे सहाजिकच करण्यांत आला. सभासदांनीं रोखीनें बरेच पैसे भरल्यास त्यांस व्याजामध्यें पुरेपूर सवलत द्यावी, असें रजिस्ट्रारनीं सोसायट्यांस कळविलें. ह्या धोरणाचा सुपरिणाम विशेषतः महाराष्ट्रांतील कालव्याखालील सोसायट्यांचे बाबतींत आढळून आला. तथापि, बाजारभावांतील वाढ तात्कालिक ठरल्यामुळें ह्या सवलतीचा फायदा सर्व शेतकरी घेऊं शकले नाहींत.

### धान्याचीं सहकारी दुकानें

गेल्या महायुद्धाचे वेळीं व्यापारी आणि कारखानदार ह्यांच्या नफेबाजीस ऊत आला होता, त्याची पुनरावृत्ति होऊं नये ह्यासाठी सध्याचें युद्ध सुरू झाल्याबरोबर सरकारनें दक्षतापूर्वक उपाययोजना केली. कांहीं लोकांनीं मालाचा साठा करून ठेवल्यामुळें आणि कांहीं मालाचा पुरवठा तात्पुरता कमी पडल्यामुळें, तसेंच जागतिक कारणांमुळें रहाणीचा खर्च वाढणें अपरिहार्य होतें. नफेबाजीस आळा घालण्याचें आणि आवश्यक त्या जिनसांचा

वक्तशीर पुरवठा चालू ठेवण्याचें एक उपयुक्त साधन ह्या दृष्टीनें कंझ्यूमर्स ( उपभोक्त्यांच्या ) सहकारी संस्थांचें महत्त्व जनतेस पटवून देण्याचा यत्न करण्यांत आला, परंतु त्यास लोकांचा इष्ट तो पाठिंबा मिळाला नाहीं. डिसेंबरनंतर पुन: बाजारभाव वाढले, तेव्हां कामगारांकरितां स्वस्त धान्याचा पुरवठा करण्याचा प्रश्न उपस्थित झाला. मुंबई आणि अहमदाबाद येथील गिरणी मालकांनीं हें काम हातीं घेतलें. त्यांनीं उघडलेलीं दुकानें सहकारी संस्थांकडे चालविण्यास देण्यांत यावीत, अशी एक कल्पना होती ती पुढें सोडून द्यावी लागली. फक्त सुरत जिल्ह्यामध्यें, सुरत जिल्हा सहकारी खरेदी-विक्री यूनियननें मूळ किंमतीस धान्य विकणारीं दुकानें काढण्याच्या योजनेस सरकारनें संमति दिली. ह्या योजनेस येणाऱ्या पहिल्या सहामाहींतील २ हजारांपर्यंतचा एकूण निम्मा खर्च सोसण्याचें सरकारनें मान्य केलें. यूनियननें त्याप्रमाणें दुकानें काढलीं असून जिल्हा बँकेनें ४% व्याजानें त्यांस पैसे पुरविण्याचें कबूल केलें आहे. ज्या परिस्थितींत ह्या प्रयोगास प्रारंभ झाला, ती परिस्थितीच झपाट्यानें बदलत गेल्यामुळें त्यासंबंधीं मत देतां येणें कठीण आहे.

### कर्जरोख्यांच्या किंमतीमधील घट

युद्धामुळें उपस्थित झालेल्या परिस्थितीचा परिणाम सहकारी बँकांवर एका विशेष रीतीनें झाला आहे, त्याचें विवेचनहि श्री. वैकुंठराय ह्यांनीं आपल्या लेखांत केलें आहे. सहकारी बँकांजवळ बऱ्याच किंमतीचे सरकारी रोखे असतात आणि त्यांत वाढ व्हावी असाच प्रयत्न चालू आहे. ह्या रोख्यांची किंमत उतरल्यामुळें येणारी तूट भरून काढण्याइतके रिझर्व्ह त्या बँकांपाशीं नाहींत. युद्धाचा परिणाम रोख्यांची किंमत उतरण्यांत झाला आहे. ह्याला उपाय काय करावा ? बँकांस पडलेली किंमत रोख्यांच्या दर्शनी किंमतीपेक्षा कमी असेल, आणि मुदत भरेपर्यंत रोखे बँक धारण करणार असेल, तर त्यांची किंमत उतरली तरी त्याची वेगळी तरतूद करण्याची आवश्यकता नाहीं. पडलेली किंमत दर्शनी किंमतीपेक्षा अधिक असल्यास, त्याची तरतूद मात्र रिझर्व्हमधून अथवा वार्षिक नफ्यांतून केली पाहिजे. रोखे दीर्घ मुदतीचे अगर बिनमुदतीचे असतील, तर त्यांचे बाबतींत मात्र बँकेस विशेष व्यवस्था करावी लागेल. मुंबई को. बँक्स असोसिएशननें हें धोरण आपल्या सभासद-बँकांस सुचविलेलें आहे. "अर्था"चे गेल्या दिवाळी अंकांतील " युद्ध परिस्थिति आणि बँकांपुढील प्रश्न " ह्या लेखानें वरील विषयावर चांगला प्रकाश पाडला असून त्यांत महत्वाच्या सूचना करण्यांत आल्या आहेत.

### फायद्यापेक्षा तोटाच अधिक ?

युद्धास प्रारंभ झाल्यावर कांहीं आठवड्यांनंतर कित्येक सहकारी बँकांतील ठेवी कमी होऊं लागल्या. गुजराथमध्यें हा अनुभव विशेष जाणवला. सुमारें सहा केंद्रांतून मिळून २५ ते ३५ लक्ष रुपये काढून घेण्यांत आले, ते पुन: थोड्या दिवसांनीं बँकांकडे परत आले. रिझर्व्ह बँकेचा धावा करावा न लागतां बँकांस ह्या परिस्थितीस तोंड देतां आलें, ह्यावरून सहकारी बँकांचा आंतिम भक्कमपणा सिद्ध झाला. तथापि, केंद्रीभूत सहकारी प्रांतिक बँक आणि रिझर्व्ह बँक ह्यांचे नातें व्यवस्थित जोडलें जाऊन रिझर्व्ह बँकेचा सहकारी चळवळीस फायदा सत्वर मिळूं लागण्याची आवश्यकता मात्र आतां सिद्ध झाली. कॉंग्रेस मंत्रिमंडळानें आखलेला शेतकऱ्यांच्या सुधारणेचा कार्यक्रम युद्धामुळें मागें पडला असून शेतकऱ्यांच्या कर्जफेडीचा प्रश्न आणि शेतीच्या मालाच्या वक्तशीर उठावाचा प्रश्न तसाच राहून गेला आहे. ह्या बाबतींत मुंबई प्रांताचे पुढें इतर सर्व प्रांत गेले आहेत. युद्ध परिस्थितीपासून शेतकऱ्यांचा फायदा तर झाला नाहींच, परंतु त्यांच्या उद्धारासाठीं आखलेल्या योजनाहि स्थगित झाल्या आहेत.

---

## मुंबई प्रांतांतील शिक्षणाची प्रगति

| | १९३७–३८ | १९३८–३९ |
|---|---|---|
| एकूण शिक्षणसंस्था | १५,०४० | १८,७२९ |
| सरकार-मान्य शिक्षणसंस्था | १४,३६६ | १८,२११ |
| कॉलेजें | १७ | १७ |
| धंदेशिक्षणाचीं कॉलेजें | १२ | १२ |
| दुय्यम शिक्षणाच्या शाळा | ६७६ | ७३० |
| स्पेशल शाळा | ४१६ | १,०१६ |
| प्राथमिक शाळा | १३,२४४ | १६,४३५ |
| किती गांवांत शाळा आहेत ? | ९,१८० | ११,८६२ |
| विद्यार्थ्यांची संख्या | १४,०३,४०१ | १५,६६,४४१ |
| सरकारमान्य संस्थेंतील विद्यार्थ्यांचें एकूण विद्यार्थ्यांशी प्रमाण | ७·६२% | ८·५८% |
| सरकारमान्य संस्थेंतील मुलगे | १०,२७,६७३ | ११,६०,२८० |
| ,, ,, मुली | ३,३७,७५२ | ३,७६,४८३ |
| शिकणाऱ्या मुलग्यांचें एकूण लोकसंख्येशी प्रमाण | ११·३६% | १२·७०% |
| शिकणाऱ्या मुलींचें तत्सम प्रमाण | ४·०३% | ४·४८% |

### शिक्षणप्रसाराच्या मार्गांतील अडचण

प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारास विरळ लोकवस्तीमुळें अडचण येत आहे. मुंबई प्रांतांत लोकवस्तीचें दर चौरस मैलास प्रमाण २३२ पडतें, तें मद्रास प्रांतांत ३१५ आणि बंगालमध्यें ६४७ पडतें. सबंध हिंदुस्थानाची सरासरी २४८ आहे. ह्या मानानें युरोपांतील आणि अमेरिकेंतील औद्योगिक देशांत लोकवस्ती किती तरी दाट–दर चौरस मैलास–८०० आहे.

### विद्यार्थ्यांची वर्गवारी

सरकारमान्य संस्थांत शिक्षण घेणाऱ्या १५,३६,७६३ विद्यार्थ्यांपैकी १३,२२,६६८ विद्यार्थी प्राथमिक शाळांत; १,५२,२५६ दुय्यम शाळांत आणि १५,२२० कॉलेजांत शिक्षण घेत होते. १९३७–३८ च्या मानानें १९३८–३९ मध्यें प्राथमिक शाळांत २,७९० ची भर पडली, त्यांपैकी २,३८९ शाळा ह्या साक्षरता-प्रसाराच्या सरकारनें सुरू केलेल्या मोहिमेचा परिणाम आहे.

### कॉलेजांतील विद्यार्थी

मुंबई प्रांताच्या ब्रिटिश हद्दींतील ३० कॉलेजांतील १५,४२० विद्यार्थ्यांपैकी १०,७९८ आर्टस व सायन्स कॉलेजांत जात होते व त्यांत १,४९७ विद्यार्थिनी होत्या. व्यवसायविषयक कॉलेजांतील ४,४०३ विद्यार्थ्यांची वर्गवारी अशी होती:—१,४१५ कायदा; १,३२३ डाक्टरी; १९७ इंजिनिअरिंग; २०० शेती; १,१०१ व्यापार; ५३ केमिकल टेक्नॉलॉजी; १०९ बी. टी.

### शिक्षणावरील खर्च

सबंद प्रांताचा शिक्षणावरील खर्च १९३७–३८ मध्यें ३ कोटि, ८९ लक्ष रुपये झाला. १९३८–३९ मध्यें ह्या खर्चांत २४ लाखांची भर पडली. एकूण खर्चापैकीं सरकारनें ४५·४% चा भार सोसला; लोकल फंडांतून १६·५% खर्च झाला; २१·५% फीचे उत्पन्नांतून भागला आणि १२·६% खर्चाची तरतूद इतर मार्गानें झाली. एकूण खर्चापैकी ६३% खर्च प्राथमिक शिक्षणावर झाला.

---

# स्फुट विचार

## हिंदुस्थानांतील अमेरिकन रोख्यांची मोजदाद

इंग्लंड आणि हिंदुस्थान ह्या दोन्ही देशांस आतां अमेरिकेंतून वाढत्या प्रमाणांत लढाऊ उपयोगाचा माल आयात करावा लागणार आहे. ह्याचा परिणाम असा होईल कीं ह्या देशास अमेरिकेच्या येण्यापेक्षा देणें अधिक निघेल आणि त्याची भरपाई करण्याची व्यवस्था रिझर्व्ह बँकेस करावी लागेल. हिंदुस्थानच्या मालास अमेरिकन खंडांत अधिक गिऱ्हाइक कसें मिळेल ह्याची चौकशी करण्यासाठी दोन अधिकारी अमेरिकेस हिंदी सरकारच्या वतीनें नुकतेच गेले आहेत. अमेरिकन मालाची हिंदुस्थानास किंमत द्यावी लागेल, तिची वजावाट हिंदी मालाच्या निर्गतीच्या किंमतीशी होईल तितकी झाली तर पहावी हा या चौकशीचा उद्देश आहे. अमेरिकेंत आयातीपेक्षा निर्गत अधिक न झाली तर त्या देशाचें देणें निघणार हें निश्चित आहे. युद्धामुळें युरोपांतील देशांशीं आमचा होणारा व्यापार बंद पडला असल्यानें त्यांवर हुंड्या काढून त्यांचा उपयोग अमेरिकेचें देणें भागवण्याचीहि सोय आतां राहिलेली नाहीं. ह्यासाठी हिंदी लोकांच्या डॉलरमधील येण्याचा काटकसरीनें विनियोग करून त्याच्या मोबदल्यांत ह्या देशानें द्यावयाच्या देण्याची वजावाट केली पाहिजे. इंग्लंडमध्यें असाच प्रश्न उद्भवला असतां तेथील सरकारनें आपल्या नागरिकांच्या मालकीचे अमेरिकन रोखे स्वतःच्या ताब्यांत घेऊन त्याचा मोबदला ब्रिटिश रोखे त्यांस देण्याची व्यवस्था केल्याविषयींची हकीकत आम्ही 'अर्थां'त मागें दिली आहे. हिंदुस्थानांत त्याच प्रकारची व्यवस्था करणें अगत्याचें असल्यानें सरकारनें त्याप्रमाणें योजना केली आहे. अमेरिकन रोखे धारण करणारांनीं त्याविषयींची माहिती सरकारास पुरवली पाहिजे आणि ह्यापुढें त्यांची विल्हेवाट लावण्यापूर्वी रिझर्व्ह बँकेची संमति मिळवली पाहिजे. जरूर पडल्यास अमेरिकन रोख्यांचे ऐवजी हिंदी सरकारचे रोखे देण्यांत येतील आणि ते धारण करणारांचें नुकसान न होतां हिंदुस्थानच्या परराष्ट्रीय हुंडणावळींचें स्थैर्य कायम राखण्यास सहाय होईल.

---

## इंग्लंडचा वाढता युद्ध-खर्च

फ्रान्सचे राज्यकर्ते जर्मनी व इटली यांस शरण गेल्या कारणानें युद्ध चालू ठेवण्याची सर्व जबाबदारी इंग्लंडवर येऊन पडली आहे. फ्रेंच राष्ट्र आतां पूर्णपणें जर्मनीच्या कह्यांत गेलें आहे आणि त्याचा खरा सूत्रचालक हिटलर आहे. फ्रेंच राज्यघटनेची पुनर्रचना चालू आहे आणि तेथें लोकशाहीची स्थापना पुन्हां होणें हेंहि इंग्लंडच्या विजयावर अवलंबून आहे. आपल्या देशावर जर्मनांची स्वारी झाल्यास तिचा प्रतिकार करण्याची जय्यत तयारी ब्रिटिश सरकार आणि जनता ह्यांनीं केली आहे. ब्रिटिश विमानें इंग्लंडचें शत्रूच्या हल्ल्यांपासून संरक्षण करूनच थांबलेलीं नाहींत; जर्मनीच्या मुलखांत लढाऊ महत्त्वाच्या ठिकाणांवर हल्ले करून त्यांचा नाश करण्याचा सपाटा त्यांनीं चालवला आहे. भूमध्य समुद्रांत ब्रिटिश आरमाराचें वर्चस्व प्रस्थापित झालें असून आफ्रिकेंत इटलीस युद्धाचा कटु अनुभव येत आहे. ह्या रीतीनें निरनिराळ्या क्षेत्रांत चढाईचें धोरण चालू ठेवण्यास ब्रिटिश सरकारास फार मोठ्या व वाढत्या प्रमाणावर लढाऊ खर्च करणें प्राप्त आहे. करांच्या उत्पन्नांतून हा खर्च केवळ अंशतःच भागण्यासारखा असल्यानें राष्ट्रीय कर्जाचा आश्रय त्यास करावा लागणें स्वाभाविक आहे. ब्रिटिश पार्लमेंट व जनता ह्यांचा ह्या धोरणास हार्दिक पाठिंबा मिळत आहे. फडनवीस, सर किंग्स्ले वुड, ह्यांनीं शंभर कोटि पौंड खर्चण्याची मागितलेली परवानगी कॉमन्स सभेनें गेल्या आठवड्यांत त्यांस दिली. गेल्या मार्चमध्यें सत्तर कोटि पौंडांची परवानगी देण्यांत आली होती. त्यांतला तीन-चतुर्थांश पैसा खर्चून गेला आहे. म्हणूनच जादा शंभर कोटि पौंडांची मागणी ब्रिटिश फडनवीसांनीं केली. गेल्या चार आठवड्यांत दररोजचा युद्ध-खर्च सरासरीनें दहा कोटि रुपये होत आहे. ह्यावरून इंग्लंड किती जड बोजा सहन करीत आहे ह्याची कल्पना येईल. खर्च आणि करांचें उत्पन्न ह्यांमधील अंतर सारखें वाढत चालल्यानें करांमध्यें वाढ करणें आवश्यक होणार असल्याचें सर किंग्स्ले वुड ह्यांनीं कॉमन्स सभेंत सांगितलें.

---

## जर्मनीच्या कारवाया

फ्रेंच सत्ताधाऱ्यांनीं जर्मनीशी युद्धतहकुबीचा करार केल्यापासून इंग्लंडविरुद्ध युद्ध कसें चालू ठेवावें ह्याचा विचार हिटलर करीत आहे. जर्मन विमानें दररोज नियमानें इंग्लंडवर उड्डाण करून ठिकठिकाणीं दारूचे गोळे टाकीत आहेत. मोठ्या प्रमाणावरील हल्ल्याची ही पूर्वतयारी असावी असा अंदाज आहे. येऊं घातलेल्या हल्ल्यास तोंड देण्याची ब्रिटिश सरकारनें जय्यत सिद्धता केली आहे. ब्रिटिश विमानांनीं जर्मनीमध्यें माऱ्याच्या जागांवर बाँब टाकून त्यांचा नाश करण्याचा रोजचा क्रम अव्याहत चालू ठेवला आहे. फ्रान्समध्यें जर्मनीचें वर्चस्व पूर्णपणें स्थापन झालें आहे आणि तेथील लोकसत्तात्मक राज्यघटनेची इतिश्री झाली आहे. फ्रेंच राष्ट्र जर्मन नात्सींचें अंकित होऊन गेलें आहे. इंग्लंडनें मोठ्या धडाडीनें फ्रेंच आरमार निरुपद्रवी व निरुपयोगी करून टाकल्यानें भूमध्य समुद्रांतील जर्मनी व इटली ह्यांच्या महत्त्वाकांक्षेचा व्यूह ढासळून पडला आहे. बाल्कनमधील राजकारण नाजुक व गुंतागुंतीचें झालें आहे आणि रशिया, इटली व जर्मनी ह्यांच्या हितसंबंधाचा मेळ घालण्याचें अवघड काम हिटलरला करावें लागलें आहे. रूमेनियाचें स्वातंत्र्य संपुष्टांत आणून तुर्कस्थानचें सहाय इंग्लंडला मिळूं नये म्हणून रशियाचेमार्फत डार्डानेलसच्या बाजूस शह देण्याची कारवाई जर्मनीनें चालवली आहे. इंग्लंड व इजिप्त ह्यांचे दरम्यान तेढ उत्पन्न व्हावी ह्या उद्देशानें जर्मनीनें डाव टाकला आहे. परंतु असल्या जर्मन कारवायांस बळी पडण्याइतके लेचेपेचे तुर्की व इजिप्शन मुत्सद्दी नाहींत. तुर्कस्तानच्या मुख्य प्रधानांनीं, जर्मनीनें रशियाची उठावणी करण्याचा प्रयत्न चालवला आहे, त्यास चोख उत्तर दिलेलें आहे. भूमध्य समुद्रांत व आफ्रिकेंत इटलीस सहाय देण्याची जर्मनीची धडपड ह्या रीतीनें फुकट गेली आहे. अमेरिकन राष्ट्रहि जागरूकतेनें जर्मनीच्या डावपेचांचा प्रतिकार करीत आहे. इंग्लंडला चोहोंकडून घेरण्याचा व जर्मन सत्तेचा विस्तार करण्याचा हिटलरचा बेत सर्व जग ओळखून आहे आणि तो हाणून पाडण्याचा त्याचा निश्चय आहे. हिटलरशाहीच्या प्रतिकारार्थ हिंदुस्थानची लढाऊ तयारी झपाट्यानें चालली आहे.

---

### फेडरल कोर्टाच्या अधिकारांत वाढ

सध्याच्या युद्धपरिस्थितींत प्रिव्ही कौन्सिलकडे अपिलें नेणें अतिशय कठीण झालें आहे. तेव्हां हिंदी फेडरल कोर्टाचेंच सुप्रीम कोर्ट ऑफ अपीलमध्यें रुपांतर करण्यांत यावें आणि त्यासाठी घटना कायद्याचें २०६ वें कलम अमलांत आणावें, ह्या सूचनेचा हिंदुस्थान सरकार विचार करीत आहे. ॲक्टांत नमूद असलेल्या दिवाणी दाव्यांचे संबंधांत हायकोर्टाचे निकालावर फेडरल कोर्टाकडे अपील करतां यावें अशी व्यवस्था फेडरल विधिमंडळास एक ॲक्ट पास करून करतां येते. फेडरल कोर्टास हा अधिकार दिल्यास, प्रिव्ही कौन्सिलचीच जागा तें व्यवहारतः घेईल. फेडरल कोर्टाच्या परवानगीनें अथवा बादशहांच्या खास परवानगीनें अर्थातच प्रिव्ही कौन्सिलकडे अपील करतां येण्यास मोकळीक राहील. फेडरल कोर्टाच्या अधिकारांत वर लिहिल्याप्रमाणें वाढ करण्यांत लोकांचा प्रिव्ही कौन्सिलकडे अपील करण्याचा हक्क काढून घेण्याचा हेतु नसून, सध्याच्या परिस्थितींतील अडचण दूर करण्याचा त्यांत प्रयत्न आहे हें स्पष्ट दिसतें.

### जवाहिराचा व्यापार आणि बेल्जम-हॉलंड

युरोपांत बेल्जम व हॉलंड ह्या देशांची जवाहिरांच्या धंद्याबाबत प्रसिद्धी आहे आणि अँटवर्प व ॲम्स्टरडम हीं शहरें जवाहिराच्या व्यापाराचीं जगविख्यात शहरें आहेत. जर्मनीच्या ताब्यांत ही शहरें जाण्यापूर्वींच त्यांमधील शिलकी जवाहीर दुसरीकडे नेण्यांत आलें होतें असें म्हणतात. त्याची लूट जर्मनीच्या हातीं लागलेली नाहीं. अँटवर्प व ॲम्स्टरडम ह्या दोन शहरांत दरवर्षी सुमारें दोन ते तीन कोटि रुपये किंमतीचे हिरे आयात होतात. ते कापून व नीटनीटके करून धंदेवाले परदेशांत पाठवतात आणि त्यांची किंमत दरवर्षी सरासरीनें तेरा कोटि रुपये भरते. जवाहिरांचें काम करणारांची एकूण संख्या सुमारें चाळीस हजार आहे. त्यापैकी पंचवीस हजार बेल्जममध्यें आणि सहा हजार हॉलंडमध्यें आहेत. बाकीचे इंग्लंड, अमेरिका व दक्षिण आफ्रिका ह्या देशांत कामावर आहेत. बेल्जम आणि डच कारागिरांपैकी फारच थोडे जर्मनीच्या हातून निसटून परदेशांत जाऊं शकले असतील. ह्या कारणानें बेल्जम व हॉलंड ह्या देशांतील जवाहिरांचा धंदा दुसऱ्या देशांत स्थापणें कठिण आहे. जवाहिराला मागणी व किंमत अधिक येण्याचा चांगला संभव आहे. युद्धाच्या अनिश्चित व धोक्याच्या परिस्थितीमुळें जवाहिरांत पैसा घालण्याची प्रवृत्ति कित्येक ठिकाणीं दृढ होईल असा अंदाज आहे. बेल्जम कॉंगोमध्यें हिऱ्यांच्या मोठ्या खाणी आहेत, त्यांतील माल इंग्लंडला मिळूं शकेल. हा जर्मनीनें बेल्जममध्यें आपली सत्ता स्थापली आहे त्याचा परिणाम होणार आहे.

### इंग्लंडमध्यें मुरलेल्या फळांचा खप

साखरेंत मुरवण्यासाठी वापरण्यांत येणाऱ्या फळांची आयात परदेशांमधून सुमारें दहा लक्ष हंड्रेडवेट इतकी इंग्लंडमध्यें दरवर्षी होत असे. साखरेचा उपयोग त्या देशांत सरकारनें मर्यादित केला असल्यानें फळें मुरवण्याचा प्रघातहि मर्यादित होणें अपरिहार्य आहे. इंग्लंडमध्यें फळांची आयातहि नेहमीच्या मानानें कमी होईल असा रंग आहे. इटली व हॉलंड ह्या देशांमधून हीं फळें इंग्लंडमध्यें मोठ्या प्रमाणावर जात असत. फळांच्या एकूण आयातीच्या निम्म्या इतकी फळांची आयात ह्या दोन देशांतून होत असे, ती आतां बंद पडली आहे. कॅनडा व अमेरिका ह्या देशांतून अधिक प्रमाणांत पुरवठा होऊं शकेल. फळें आणि साखर हीं निरनिराळी आयात करण्यापेक्षां मुरलेलीं फळेंच आयात करणें इंग्लंडला अधिक सोयीचें होईल.

### बॉंबे को-ऑपरेटिव्ह क्वार्टर्ली

वरील त्रैमासिकाचा जून, १९४० चा अंक प्रसिद्ध झाला आहे. अंकांतील पहिला लेख प्रो. बा. गो. काळे ह्यांचा "मुंबई प्रांतांतील सहकारी आणि जॉइंट स्टॉक बँका" ह्या विषयावर आहे. मुंबई प्रांतांतील मोठ्या शहरांत बँकांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. परंतु लहान गांवांत तशी व्यवस्था नाहीं. तथापि, जॉइंट स्टॉक बँकांबरोबर सहकारी बँका विचारांत घेतल्या, तर हें म्हणणें तितकेसें खरें नाहीं. इतर प्रांतांत ह्यासंबंधीं काय परिस्थिति आहे, हें अर्थात पाहिलें पाहिजे. "मुंबई प्रांत सहकाराच्या बाबतींत अग्रेसर असल्याकारणानें, जॉइंट स्टॉक बँका व सहकारी बँका मिळून प्रांताची बँकिंगविषयक गरज सर्वसाधारण कल्पनेपेक्षा अधिक चांगल्या रीतीनें भागवितात," असा प्रो. काळे ह्यांच्या लेखाचा सारांश आहे. त्यांनीं आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ भरपूर आकडे दिले आहेत. श्री. एन. एम. जोशी ह्यांनीं "शेतीचे जोडधंदे" ह्या विषयावर लेख लिहिला आहे, तोहि उद्बोधक आहे. जोड धंद्यांची आवश्यकता सिद्ध करण्याची वेळ आतां उरलेली नाहीं; त्यासंबंधांतील अडचणी दूर करण्याचे पायाशुद्ध प्रयत्न करून त्यांची सांगड घालणें हें महत्त्वाचें काम आहे. ह्या जोडधंद्यांचें पुनरुज्जीवन कोणत्या रीतीनें करावें, ह्याचें श्री. जोशी ह्यांनीं दिग्दर्शन केलें आहे. अहमदाबाद जिल्हा इरिगेशन सोसायटीविषयीं माहिती श्री. सी. डी. कवी ह्यांचे लेखांत आली आहे. रत्नागिरी आंब्यांच्या पद्धतशीर उठावासाठी सहकारी सोसायट्यांची स्थापना करावी, त्यांचें फेडरेशन करावें व फेडरेशननें आंब्यांची मुंबईंत विक्री करावी म्हणजे शेतकऱ्यांचे लक्षावधि रुपये वाचतील, असें श्री. एन. आर. सूर्यवंशी हे आपल्या लेखांत सुचवितात. श्री. के. जी. आंबेगावकर ह्यांनीं इंडियन सोसायटी ऑफ ॲग्रिकल्चरल एकॉनॉमिक्सच्या परिषदेंत दिल्ली येथें "शेतीच्या जमिनींच्या तुकड्यांचें एकत्रीकरण" ह्या विषयावर एक निबंध वाचला, तो त्रैमासिकांत उद्धृत करण्यांत आला आहे. बाकीचीं उपयुक्त सदरें नेहमीप्रमाणें अंकांत आहेतच.

### बँक ऑफ इंडिया, लि.

| | रु. आ. पै |
|---|---|
| १९४० च्या पहिल्या सहामाहीचा नफा | |
| ३० जून, १९४० अखेर संपलेल्या वर्षी बँकेस झालेला नफा ११,१५,१०२-२-० | |
| त्यांतून इन्कमटॅक्स आणि सुपरटॅक्सकरितां वजा १,५०,०००-०-० | |
| निवळ नफा | ९,६५,१०२-२-० |
| मागील वर्षाच्या हिशेबांतून ओढलेले | ८,८६,३२६-८-० |
| एकूण | १८,५१,४२८-१०-० |

बँकेचें भरणा झालेलें भांडवल १ कोटि रुपये आहे, त्यावर ११% दरानें (प्रत्येक भागास २ रु. १२ आ.) पहिल्या सहामाहीचें इंटेरिम डिव्हिडंड देण्याचें डायरेक्टरांनीं ठरविलें आहे. त्यास ५,५०,००० रुपये लागतील. आणि १२,०१,४२८-१०-० पुढील सहामाहीच्या हिशेबांत ओढण्यांत येतील.

## ब्रिटिश बँकांचें धोरण व युद्धपरिस्थिति

### सरकारी रोख्यांतली गुंतवण

युद्ध परिस्थितीमध्यें रोकड शिलकेचें आणि अल्प मुदतीच्या कर्जाचें आपल्या व्यवहारांतलें प्रमाण वाढवणें बँकांस आवश्यक आणि इष्ट असतें आणि आपला पैसा अडकून पडून न रहातां तो तरता करतां येईल ह्याविषयीं त्यांस खबरदारी घ्यावी लागते. व्यापार व उद्योगधंदे ह्यांच्या मामुली व्यवस्थेंत युद्धकाळीं बदल होणें अपरिहार्य असतें आणि स्वतःच्या सुरक्षितपणास बाध न येतां आपल्या नेहमीच्या व्यवहार पद्धतीस आवश्यक झालेलें वळण त्यांस लावावें लागतें. देशांतील भांडवलाचा ओघ युद्धोपयोगी कारखान्यांतील उत्पादनाकडे वळवण्याच्या हेतूनें ब्रिटिश सरकारानें भांडवलाच्या निर्गतीवर व औद्योगिक गुंतवणीवर नियंत्रण घातलें आहे. लांब मुदतीच्या औद्योगिक भांडवलाशी व्यापारी बँकांचा प्रत्यक्ष संबंध येत नाहीं, पण अप्रत्यक्ष रीतीनें त्यांचा पैसा अल्प मुदतीनें विशिष्ट धंद्यांत गुंतत असतो. युद्धोपयोगी मालाच्या उत्पादनास लागणारें खेळतें भांडवल पुरवणें हें त्यांचें महत्त्वाचें कार्य असल्यानें त्यांनीं दिलेल्या कर्जांत ह्या दिशेनें बदल घडून आलेला आहे. ब्रिटिश बँकांनीं कर्जाऊ दिलेल्या एकूण रकमेंत युद्धामुळें घट झालेली नाहीं. तिचा आकडा कायम असून कर्जांच्या स्वरूपांत मात्र फरक झालेला आहे. परराष्ट्रीय व्यापार युद्धपरिस्थितीच्या योगानें घटला आहे आणि त्यांत उद्भवणाऱ्या हुंड्यांचा व्यवहारहि कमी झाला आहे.

व्यापारी हुंड्यांच्या डिस्कौंटचा ब्रिटिश बँकांचा व्यवहार सध्याच्या स्थितींत मर्यादित होणें अपरिहार्य आहे. त्याची जागा सरकारी ट्रेझरी बिलांनीं घेतली आहे. युद्धाप्रीत्यर्थ फार मोठ्या प्रमाणांत सरकारला खर्च करावा लागत आहे आणि त्यासाठी ट्रेझरी बिलांचे मार्गानें अल्प मुदतीचें कर्ज काढावें लागत आहे. थोड्या मुदतीच्या ह्या बिलांत बँकांनीं आपला पैसा विस्तृत प्रमाणांत गुंतवला आहे, ही युद्धकार्यास त्यांची मदतच आहे. त्यांचा पैसा तरता रहाण्याचें साधन ट्रेझरी बिलांच्या योगानें उपलब्ध झालें आहे. हा बँकांचा एक प्रकारचा फायदाच झाला आहे. ट्रेझरी बिलांचें रूपांतर कमी-अधिक मुदतीच्या कर्जरोख्यांत सरकारास आज ना उद्यां करावें लागेल. तसें झालें म्हणजे बँकांची सरकारी रोख्यांतली गुंतवण वाढेल. रोख्यांच्या किंमती विशिष्ट मर्यादेच्या खालीं जाऊं न देण्याचें सरकारचें धोरण असल्यानें बँकांच्या ताळेबंदांत येणें रकमेंत घट दाखवण्याचें कारण पडणार नाहीं. ब्रिटिश बँकांच्या जवळ गुप्त रिझर्व्ह भरपूर आहेत आणि शिवाय कर्जावरील आकारावयाचे व्याजाचे दर त्यांनीं फायदेशीर रीतीचे ठेवले आहेत. ह्यामुळें त्यांचा नफा व डिव्हिडंड हीं कमी झालेलीं नाहींत आणि होण्याची भीति नाहीं.

सरकारी कर्जरोख्यांत गुंतवावयाच्या बँकांच्या पैशाचें प्रमाण दिवसानुदिवस वाढणें अपरिहार्य आहे. रोख्यांच्या बाजारभावांत मोठा उतार झाल्यास बँकांच्या ताळेबंदांत विलक्षण गोंधळ माजेल. ह्या भीतीस उद्देशून लंडनचें "एकॉनॉमिस्ट" साप्ताहिक म्हणतें:— "विशिष्ट मर्यादेखालीं रोख्यांच्या किंमती जाऊं दिल्या जाणार नसल्यानें ह्या भीतीस सुतें जागा नाहीं. बँकांच्या ताळेबंदांत पोकळपणा उत्पन्न होण्याइतकें त्यांनीं धारण केलेल्या सरकारी रोख्यांचें प्रमाण वाढल्यास बँकांच्या हिशेबांत रोख्यांच्या कोणत्या किंमती दाखवाव्या हें सरकारानें ठरवावें लागेल. युरोपांतील अनेक देशांत ह्या संबंधांत कायद्यांनीं खास सत्ता सरकारास दिलेली आहे आणि तीस अनुसरून रोख्यांचे बाजारभाव कांहींहि असोत, त्यांच्या सोयीच्या वाटणाऱ्या किंमती बँकांच्या ताळेबंदांत दाखवितां येतात."

---

## दि ग्रेट सोशल लाइफ अँड जनरल ॲशुअरन्स लि.

वरील कंपनीनें १९३९ सालीं ७ लक्ष, ९ हजार रुपयांचीं एकूण ५७० विमापत्रकें दिलीं. त्या वर्षी कंपनीचें एकूण उत्पन्न १ लक्ष, ७½ हजार रुपये होऊन व्यवस्थेचा खर्च ७९½ हजार रुपये आला. विमाखातीं फंडांत सुमारें २८ हजारांची वाढ होऊन तो १ लक्ष, ४०½ हजार रुपये झाला. कंपनीनें नवीन विमा कायद्यास अनुसरून सरकारकडे १ लक्ष, ४७ हजारांचे रोखे ठेवले आहेत. बंगाल, बिहार, निजाम स्टेट व मध्य हिंदुस्थान येथें ग्रेट सोशलनें आपलें कार्यक्षेत्र पसरलें आहे. मुंबई येथील सर फिरोजशहा मेहता रोडवर कंपनीनें स्वतःच्या इमारतीकरितां एक जागा मुक्रर केली असून इमारतीचें बांधकाम चालू आहे. वरील सर्व माहिती कंपनीच्या डायरेक्टरांचे रिपोर्टांत दिलेली आहे. कंपनीचें वसूल भांडवल सुमारें ७५½ हजार रुपये असून ८०० रुपयांचे रिझर्व्ह आहेत. कंपनीकडे १५½ हजारांच्या ठेवी आहेत आणि लाइफ फंड १ लक्ष, ४०½ हजार रुपये आहे. जिंदगीचे बाजूस १ लक्ष, ३२ हजारांचे रोखे, ४½ हजारांचा प्राथमिक खर्च, ३½ हजारांचें फर्निचर, १,३०० रुपयांची मोटर, २१ हजारांचीं सेव्हिंग क्लॉक्स, १९ हजारांचा संघटना खर्च, ३६½ हजारांचें येणें, २ हजारांचीं विमेदारांस दिलेलीं कर्जें, २४ हजार रोख आणि बँकांत शिलक वगैरे बाबी आहेत. श्री. व्ही. एन. पाटील, बार-ॲट-लॉ हे कंपनीचे चेअरमन असून मेसर्स आय. पाटील अँड सन्स हे मॅनेजिंग एजंट्स आहेत. श्री. ग. स. मराठे हे कंपनीचे ॲक्चुअरी आहेत. कंपनीनें आपल्या गेल्या मूल्यमापनांत तहाहयात रु. ६० व हयातींत रु. ५७ असा दर हजारी पंचवार्षिक बोनस जाहीर केलेला आहे. लक्ष्मी रोड, पुणें, येथें कंपनीची शाखा—कचेरी आहे. मॅनेजिंग एजंट्स कंपनीचें काम वाढविण्याचा निष्ठेनें कसून प्रयत्न करीत आहेत, त्याबद्दल बोर्डानें काढलेले उद्गार योग्य असेच आहेत.

---

## टिटाघर पेपर मिल्स लि.

वरील कंपनीचें भरणा झालेलें भांडवल ४८ लक्ष, ३८½ हजार रु. असून २५ लाखांचीं डिबेंचर्स आणि ४४ लक्ष, ५६½ हजार रुपयांचे रिझर्व्ह आहेत. ३० लक्ष, २० हजारांचीं देणीं असून नफा-तोटा खातीं ५ लक्ष, ६२ हजार रुपये शिलक आहेत. जिंदगीचे बाजूस ८० लक्ष रुपयांच्या जमिनी, इमारती, यंत्रें, वगैरे असून ५½ लक्ष रुपयांचा कागद, २९½ लक्ष रुपयांचा कच्चा माल, २७½ लक्ष रुपयांचीं देणीं, ११½ लक्ष रुपये रोख आणि गुंतविलेले, वगैरे बाबी आहेत. ३१ मार्च, १९४० अखेरच्या ताळेबंदावरून ही माहिती मिळते. मेसर्स एफ. डब्ल्यू हेल्जर्स आणि कं. हे मॅनेजिंग एजंट्स आहेत.

---

## आंतरराष्ट्रीय मजूर परिषदेचे करार

### हिंदुस्थानानें मान्य केलेलीं बंधनें

गेल्या महायुद्धाचे अखेर १९१९ मध्यें पॅरिस येथें तह झाला, त्यांत एक अंग म्हणून राष्ट्रसंघाची व आंतरराष्ट्रीय मजूर परिषदेची संघटना करण्याचें ठरलें. ह्या घटनेनुसार आंतरराष्ट्रीय मजूर परिषदेच्या कचेरीची जिनीव्हा येथें स्थापना झाली. प्रतिवर्षी परिषदेचें अधिवेशन भरतें, त्यावेळीं समासद राष्ट्रांतून सरकार, मालक व मजूर ह्यांचे प्रतिनिधी तेथें जातात. परिषदेंत ठरलेलें धोरण शक्यतेनुसार अमलांत आणणें हें त्या राष्ट्रांचें कर्तव्य असतें. हिंदुस्थानास मजूर परिषदेचे संघटनेंत महत्त्वाचें स्थान आहे. आंतरराष्ट्रीय मजूर परिषदेनें आतांपर्यंत एकूण ६३ करारांस मंजुरी दिली, त्यांपैकीं १४ करारांस हिंदुस्थान देशानें बांधून घेतलेले आहे. औद्योगिक क्षेत्रांत पुढारलेल्या राष्ट्रांनीं, म्हणजे ग्रेटब्रिटन, अमेरिका, फ्रान्स आणि इटली ह्यांनीं, अनुक्रमें २७, ५, २२ आणि २० करारांस मान्यता दिलेली आहे. खालीं दिलेल्या तक्त्यांत हिंदुस्थानानें स्वीकारलेल्या करारांसंबंधीं माहिती दिली आहे:—

| नं. क्रं | कराराचा विषय | कराराची तारीख | त्याबाबत कायदा |
|---|---|---|---|
| १ | कारखान्यांतील कामाचे तास दिवसा ८ आणि आठवड्यांत ४८ असे ठरविणें. ( हिंदुस्थानांत ६० तासांचा आठवडा ) | १४–७–२१ | इंडियन फॅक्टरीज ॲक्ट, माइन्स ॲक्ट, रेलवेज ॲक्ट इ० |
| २ | स्त्रियांस रात्रपाळीचें काम करण्याची बंदी. ( हिंदुस्थानास सवलत ) | १४–७–२१ | फॅक्टरीज ॲक्ट. |
| ३ | मुलांच्या कामास रात्री बंदी. ( हिंदुस्थानांत १४ वर्षांखालील मुलांस बंदी ) | १४–७–२१ | फॅक्टरीज ॲक्ट. |
| ४ | कारखान्यांतील कामगारांप्रमाणेंच शेतावर काम करणारांस संघटना करण्याचा अधिकार. | ११–५–२३ | इंडियन ट्रेड युनियन्स ॲक्ट. |
| ५ | कारखान्यांतील कामगारांस साप्ताहिक सुट्टी. | ११–५–२३ | ॲ. नं. १ प्रमाणें. |
| ६ | आगबोटींवरील कामगारांचें किमान वय. | २०-११-२२ | इंडियन मर्चंट शिपिंग ॲक्ट. |
| ७ | आगबोटींवर काम करणाऱ्या मुलांची सक्तीनें वैद्यकीय तपासणी. | २०-११-२२ | इंडियन मर्चंट शिपिंग ॲक्ट. |
| ८ | कामाच्या अनुषंगानें होणाऱ्या रोगांमुळें कामगारांच्या झालेल्या नुकसानीची भरपाई. | १०–६–२७ | वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ॲक्ट. |
| ९ | अपघातांबद्दलच्या नुकसानभरपाईबाबत स्थानिक आणि विदेशी कामगारांस एकच तत्त्व. | १०–६–२७ | वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ॲक्ट त्याबाबत नियम इ० |
| १० | देश सोडून परदेशीं वसाहतीसाठीं जाणारांची आगबोटीवरील तपासणी. | १४–१–२८ | इंडियन एमिग्रेशन ॲक्ट. |
| ११ | खलाशांच्या करारांतील अटी. | ११-१०-१२ | इंडियन मर्चंट शिपिंग ॲक्ट, इंडियन कॉन्ट्रॅक्ट ॲक्ट इ० |
| १२ | आगबोटींतून पाठवावयाच्या जड डागांवर त्यांच्या वजनाचा शिक्का मारणें. | ७–६–११ | मुंबई, कराची, मद्रास, इ० बंदरांच्या अधिकाऱ्यांनीं केलेली तजवीज. |

## संग्रहालयें

पुणें येथील लॉर्ड रे इं. म्युझियम कसा चालतो व त्यांतील कामें कशीं चालविलीं जातात यासंबंधीं संपूर्ण माहिती इतरत्र अशीं संग्रहालयें स्थापन करावयासाठी व चालविण्यासाठी मार्गदर्शक व्हावी म्हणून संग्रहालयानें तयार केला आहे. या संपूर्ण माहितीचा एक गट मुंबई इलाख्याच्या लोकल सेल्फ गव्हर्मेंट इन्स्टिट्यूट या संस्थेनें खरेदी केला आहे. संग्रहालयें व प्रदर्शनें या विषयांचेसंबंधीं एक विस्तृत पत्रक प्रसिद्ध करून मुंबई इलाख्यांतील सर्व प्रमुख म्युनिसिपॅलिट्यांकडे त्यांनीं पुणें शहर म्युनिसिपॅलिटीचें अनुकरण करून संग्रहालयें व प्रदर्शनें चालवावीं यासाठी पाठविण्यांत आलें आहे. प्राथमिक शाळांचेसाठी मराठी अभ्यासक्रम व शाळा-कॉलेजें यांचेसाठीं इंग्रजी अभ्यासक्रम चालू नवीन वर्षाचेसाठी तयार केले आहेत ते संस्थांना देण्यांत येतील व त्यांचे अनुरोधानें संग्रहालयांतील विषय शाळांनीं आपल्या विद्यार्थ्यांस शिकवावयाचे आहेत. या विषयांचे पाठ देण्यासाठीं लागणारी सर्व माहिती संग्रहालयांत उत्तम प्रकारें तयार ठेविली आहे. या अभ्यासक्रमांना मान्यता द्यावी अशी शिफारस मुंबई प्रांतिक सरकारनें मुंबई युनिव्हर्सिटीकडे केली आहे.

## दारूबंदीविषयक सरकारचें धोरण

### ( सरकारी पत्रकाचा सारांश )

"मुंबई शहरांत दारूबंदी करणारा मूळ जाहीरनामा कायदेशीर नाहीं, गव्हर्नर्स ॲक्टानें तो कायदेशीर होऊं शकत नाहीं, आणि कस्टम्सच्या सीमेवरून दारूची आयात–निर्गत करण्यास प्रतिबंध होईल असा कायदा करण्याचा अधिकार प्रांतिक विधिमंडळांस नाहीं." असा हायकोर्टानें १ जुलै रोजीं निवाडा केला. विलायती दारूची संवय असणारांची पूर्ण दारूबंदीमुळें होणारी गैरसोय थोडी दूर करावी, असें सरकारास त्यापूर्वीच कांहीं काळ वाटत होतें. हायकोर्टाचे निवाड्यावर फेडरल कोर्टाकडे अपील करण्यासाठी सर्टिफिकेट मागण्याचा सरकारचा विचार आहे. तथापि, जोपर्यंत सध्याच्यां हायकोर्टाचा निवाडा हाच प्रमाणभूत कायदा आहे, तोपर्यंत दारूबंदीसाठी पुनः जाहीरनामा काढणें अगर एकादा खास ॲक्ट करणें श्रेयस्कर होणार नाहीं. अबकारी ॲक्टाऐवजी स्वतंत्र दारूबंदीचा कायदाच करणें इष्ट होईल, आणि तो विधिमंडळानेंच मंजूर करणें हितावह आहे. सद्यःस्थितींत, देशी दारूचा खप शक्य तेवढा कमी करणें व विदेशी दारूबाबत अटी सढळ करणें, एवढेंच सरकारास करणें शक्य आहे. आतां ह्यापुढें दारूबंदीच्या क्षेत्रांत देशी दारू अगर ताडी विकूं दिली जाणार नाहीं. त्याची आयात पूर्णपणें थांबविणें अशक्य असलें, तरी त्यावर जबर जकात लावून दारूच्या आयातीवर बंधन घातलें जाईल. विलायती दारू लोकांस मिळूं शकेल. क्लब, चांगलीं होटेल्स व रेस्टॉरंट ह्यांतून विदेशी दारू विकण्यास हरकत होणार नाहीं. ह्यामुळें येणाऱ्या जादा उत्पन्नाचा विनियोग मालमत्तेवरील कराचा बोजा कमी करण्याकडे केला जाईल. सारांश, मुंबईमध्यें देशी दारू अगर ताडी विकत मिळणार नाहीं, आयात पेयावर जबर जकात पडेल, त्याची आयात करणारास तें पितां येईल परंतु विकतां येणार नाहीं. विदेशी दारूच्या विक्रीचा परवाना असलेल्या दुकानांत ती मिळूं शकेल.

### बँकांच्या कामाचे तास

१२ जुलै, १९४० पासून मुंबईतील प्रमुख बँकांनीं आपली कामाची वेळ खालीलप्रमाणें केली आहे:—

शनिवारीं सकाळीं १०–३० ते दुपारीं १–३०.
इतर दिवशीं सकाळीं १०–३० ते दुपारीं ४.

### सेल्युलॉइडचीं जपानी खेळणीं

जपाननें १९३९ मध्यें सेल्युलॉइडच्या खेळण्यांची निर्गत केली, तिचा तपशील खालीं दिला आहे:—

| निर्गत कोणीकडे | डझन खेळणीं |
|---|---|
| आशिया | १३ लक्ष, ७८ हजार |
| युरोप | ५ लक्ष, ४२ हजार |
| उत्तर अमेरिका | १४ लक्ष, ६ हजार |
| दक्षिण अमेरिका | ८ लक्ष, १५ हजार |
| आफ्रिका | १ लक्ष, ३ हजार |
| ऑस्ट्रेलिया | ३ लक्ष, ९९ हजार |

ह्या निर्गतीची वर्गवारी पुढीलप्रमाणें आहे:—

| खेळणें | डझन |
|---|---|
| सुट्या हातपायाच्या बाहुल्या | १० लक्ष, ४८ हजार |
| नागड्या बाहुल्या | ३ लक्ष, ६६ हजार |
| मदन | ३४ हजार |
| साध्या बाहुल्या | १० लक्ष, ९६ हजार |
| खरखर वाजणारीं खेळणीं | ६ लक्ष, २५ हजार |
| इतर खेळणीं | ५ लक्ष, १६ हजार |
| आंतून भरलेलीं खेळणीं | ६४ हजार |
| सुटे भाग जोडलेलीं खेळणीं | २० हजार |

ह्याच मुदतींत जपाननें ५०½ लक्ष कचकड्याच्या बांगड्या परदेशांत विकल्या, त्यांपैकीं ४४½ लक्ष बांगड्या हिंदुस्थानांत आणि ४ लक्ष, ८८ हजार बांगड्या आफ्रिकेंत खपल्या.

### जपानी पेन्सिली

जपानी मालाच्या आयातीवर बहुतेक देशांनीं बंधनें घातलीं असल्या कारणानें आणि पेन्सिलींस लागणाऱ्या कच्च्या मालाचा पुरवठा पुरेसा नसल्याकारणानें १९३८ सालीं जपानी पेन्सिलींची निर्गत कमी झाली होती. तथापि, १९३९ सालीं चीननें जपानी पेन्सिलींची आयात मोठ्या प्रमाणावर करण्यास प्रारंभ केला आणि निर्गतीचा आकडा पुनः पूर्वठिकाणीं येऊं लागला. १९३९ सालीं जपाननें २२ लक्ष, १९ हजार ग्रोस पेन्सिली परदेशीं पाठविल्या. चीननें १९३८ सालाच्या मानानें चौपट पेन्सिली घेतल्या. मँच्यूकियोच्या आयातीचा अनुक्रम नंतर लागतो. ह्या दोघांनीं मिळून जपानी निर्गतीच्या ५५% पेन्सिली उचलल्या. ब्रिटिश हिंदुस्थानानें १९३९ सालीं १ लक्ष, ४४ हजार ग्रोस जपानी पेन्सिली घेतल्या.

### आय. सी. एस. परीक्षेचा निकाल

जानेवारी, १९४० मध्यें दिल्ली येथें आय्. सी. एस्. ची परीक्षा झाली, त्यांत पहिले आलेले मुंबई प्रांतांतील महाराष्ट्रीय श्री. एम्. आर. यार्दी ह्यांस लेखी परीक्षेंत १३०० पैकीं ९७६ व तोंडी परीक्षेंत ३०० पैकीं १७० गुण मिळाले. दुसरा नंबर आलेले श्री. सखदेव व्होरा ह्यांस लेखी परीक्षेंत ८३४ व तोंडी परीक्षेंत २६० गुण मिळाले. आय्. सी. एस्. साठीं निवडलेले श्री. आर. सी. जोशी ह्यांस लेखी परीक्षेंत ८३१ व तोंडी परीक्षेंत २०० गुण मिळाले व त्यांचा अनुक्रम आठवा लागला. पहिल्या आठ उमेदवारांची निवड करण्यांत आली आहे. परीक्षेस एकूण ४६७ उमेदवार बसले होते, त्यांपैकीं ज्यांस लेखी परीक्षेंत ६५० पेक्षा अधिक गुण मिळाले, अशांचीच म्हणजे १७६ लोकांची तोंडी परीक्षा घेण्यांत आली.

### मराठा चेंबरची वार्षिक सभा

येथील मराठा चेंबर ऑफ कॉमर्सची वार्षिक सभा गेल्या रविवारीं प्रो. काळे ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. गेल्या सालचा वृत्तांत आणि हिशेब मान्य करण्यांत आल्यावर पुढच्या सालासाठीं अध्यक्ष, उपाध्यक्ष, सल्लागार मंडळ, कार्यकारी मंडळ, कार्यवाह व हिशेब तपासनीस ह्यांच्या निवडणुकी झाल्या, होतकरू तरुणांस दुकानदारीचें व्यावहारिक शिक्षण देण्यासंबंधांत योजना प्रयोगादाखल हातीं घेण्यांत यावी अशी सूचना चर्चेमध्यें निघाली, तिची अंमलबजावणी करण्याचें ठरलें. युद्धपरिस्थितींत व्यापार व उद्योगधंदे ह्यांच्या मार्गांत कोणत्या अडचणी उपस्थित होतात आणि त्यांच्या विस्ताराची संधीहि कशी उपस्थित होते, ह्याचें अध्यक्षांनीं विवेचन केलें. हिंदी धंदेवाल्यांचे पुढें आज कोणते प्रश्न उभे आहेत आणि ते कसे सोडवले पाहिजेत ह्या विषयीं त्यांनीं विचार प्रदर्शित केले आणि महाराष्ट्रांतील कारखानदार आणि व्यापारी ह्यांनीं कोणतें धोरण सध्याच्या स्थितींत अंगिकारलें पाहिजे ह्या संबंधानें दिग्दर्शन केलें. कॉफीपान झाल्यावर सभा विसर्जन करण्यांत आली.

---

### इंग्लंडमध्यें फौजेची जय्यत तयारी

शत्रूचें जळजळित स्वागत करण्यास बारा लक्ष सशस्त्र फौज इंग्लंडमध्यें खडी आहे. ह्या शिवाय दहा लक्ष लोक आपल्या देशाच्या संरक्षणास तयार आहेत, ते वेगळेच. एवढी फौज इंग्लंडमध्यें मागच्या किंवा चालू युद्धांत कधींच सज्ज नव्हती.

### कृत्रिम रबर

कृत्रिम रीतीनें रबर तयार करण्याच्या कारखान्यांची तयारी अमेरिकेंत मोठ्या प्रमाणावर झाली आहे. कृत्रिम रबराचें उत्पादन लवकरच वाढून अमेरिकेचें बाहेरून येणाऱ्या रबरावरचें अवलंबन नाहींसें होईल अशी अपेक्षा आहे.

### भुइमुगाच्या पिकाचें क्षेत्र मर्यादित करण्याची आवश्यकता

युरोपियन देशांत होणारी हिंदी भुइमुगाची निर्गत बंद पडल्याकारणानें त्याच्या पिकाचें क्षेत्र मद्रासमध्यें मर्यादित करण्यांत यावें असा सल्ला हिंदुस्थान सरकारनें त्या प्रांताच्या सरकारास दिला आहे.

### इंग्लंडमध्यें अन्नाचा पुरवठा

इंग्लंडच्या आयात व्यापाराची नाकेबंदी करण्याचा जर्मनीचा प्रयत्न आहे. समुद्रावर इंग्लंडचें वर्चस्व कायम असल्यानें ह्या प्रयत्नास यश येणें शक्य नाहीं. तरीहि शेतीचें उत्पन्न इंग्लंडमध्यें वाढवण्याची खटपट ब्रिटिश सरकार जोरानें करीत आहे. उलट, जर्मनी व त्याच्या शेजारचे देश ह्यांमध्यें खाण्यापिण्याच्या जिनसांचा तुटवडा पडला आहे.

### मि. चर्चिल ह्यांचें भाषण

युद्ध परिस्थितीचा आढावा घेऊन ब्रिटिश मुख्य प्रधान, मि. चर्चिल, ह्यांनीं, शत्रूच्या कोणत्याहि हल्ल्यास यशस्वी रीतीनें तोंड देण्याची इंग्लंडची कशी जय्यत तयारी आहे ह्याचें ठसठशित भाषेंत नुकतेंच वर्णन केलें. ह्या भाषणानें उत्साहाचें आणि निश्चयाचें वातावरण निर्माण केलें आहे आणि जर्मनीच्या बढायांस उत्कृष्ट उत्तर दिलें आहे.

## कांहीं खेडेगावी धंदे

**काथ्याचे दोर आणि चटया तयार करण्याचा धंदा**

गतवर्षीप्रमाणें या सालाचें होनावर येथील काथ्याचे दोर, चटया व पायपुसणी तयार करण्यास शिकविण्याच्या केंद्राचें काम समाधानकारक होतें. श्री. बाळासाहेब खेर व मि. एच. एफ. नाइट यांनीं या वर्षी केंद्रास भेट दिली. तेथील प्रमुख श्री. एस. के. कल्लापूर यांनीं कोचीन व त्रावणकोर येथें जाऊन तेथील धंद्याची प्रत्यक्ष पाहाणी केली; व तेथें आढळलेल्या सोयी व सुधारणा होनावर येथील केंद्रांत घडवून आणण्याचा प्रयत्न केला, त्यांत त्यांना बरेचसें यशहि आलें.

चरख्यावर काथ्याचें सूत काढण्याकरितां एकूण ९० स्त्रिया व मुलें घेण्यांत आलीं. २० लोकांनीं पायपुसणी तयार करण्याचें शिक्षण घेतलें. दोर वळण्याचें काम पूर्वीप्रमाणेंच झालें. अधिक लोकांनीं यंत्राचा उपयोग केला. एक स्थानिक गृहस्थ दोर वळण्याचा धंदा गांवांत स्वतंत्रपणें चालवीत आहे. गतवर्षी विणकामाच्या खात्यांत काम करीत असलेल्या १२ तरुणांनीं सप्टेंबरपर्यंत त्याच खात्यांत काम करून निपुणता मिळवली. त्यांनीं विणलेल्या दिखाऊ चटया उच्च दर्जाच्या होत्या.

होनावरखेरीज इतर चार ठिकाणीं काथ्याचा धंदा सुरू करण्यांत आला. चरख्यावर सर्वसाधारण विणकरी ८ तासांत ११०० फूट लांबीचे धागे काढतो.

बारीक सुबक काथ्याच्या एका पौंडांत एकूण४००-५०० फूट लांबीचे काथ्याचे धागे असतात. अशा तऱ्हेचा धागा उंची मालाकरितां उपयोगांत आणला जातो. इतक्या उंची चटया परदेशी खपतात; म्हणून तिकडे पाठविण्यांत येतात. स्थानिक उपयोगासाठी एक पौंड वजनाच्या काथ्यांत एकूण २०० फूट लांब काथ्याचे धागे असतात. अशा काथ्यास मागणी चांगली आहे.

धागे तयार झाल्यानंतर तें गुंडाळणें, गुंतू न देतां गुंडाळणें याकरितां दोन यंत्रें लागतात; त्यांचा उपयोग त्रावणकोर-कोचीनच्या भागांत केला जातो. त्या पद्धतीवर होनावरला यंत्रें तयार करवून घेण्यांत आलीं. तीं कामचलाऊ झालीं, परंतु तितकी सफाइदार व सुबक झाली नाहींत.

काथ्याची पायपुसणी करण्याचा धंदा अगदी स्वल्प खर्चाचा आहे. रुपये ५-८ चीं हत्यारें पुरतात. तसेंच शिक्षणहि फार घ्यावें लागत नाहीं. शिवाय त्यांत उपयोगांत आणलेला माल सूत काढतांना व विणतांना टाकाऊ झालेला काथ्याच असतो. मालाची मागणीहि सर्वत्र असते. होनावर केंद्रांत या शिक्षणाची सोय चालू वर्षापासूनच करण्यांत आली.

होनावर केंद्रांत शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्यांनीं परस्पर-सहायक संस्था काढली आहे.

या शिक्षणकेंद्रावर एकूण रु. १,२९६ खर्च झाले; रु. ६८७ ची विक्री झाली.

**नीरेपासून गूळ तयार करण्याचा धंदा**

गतवर्षाप्रमाणें नीरेपासून गूळ तयार करण्याचें कार्य होसर येथें पुढें चालविण्यांत आलें. एकंदर पांच महिन्यांत ६० झाडांपासून १५ हजार पौंडांवर नीरा काढण्यांत आली व त्यापासून अदमासें १९ शे पौंड गूळ तयार करण्यांत आला. झाडें मध्यम प्रतीचीं होतीं, नाहीं तर याहूनहि अधिक नीरा व गूळ तयार झाला असता. दहा लोकांनीं शिक्षण घेतलें. तयार केलेला सर्व गूळ स्थानिक बाजारांत विकण्यांत आला. या शिक्षण-केंद्रावर रु. ६१५ खर्च करण्यांत आले.

खाजगी प्रयत्न करण्यास उत्तेजन देण्यांत आलें. सुरत जिल्ह्यांतील आटगांव येथील एका गृहस्थास रु. १०० देण्यांत आले. त्यानें ५० झाडांपासून नीरा काढून गूळ केला. आसपासच्या ५० लोकांना येथें शिक्षण मिळालें.

पंचमहाल एज्युकेशन सोसायटीच्या सेक्रेटरींना कलोल येथें पामिरा ( Palmyra ) झाडांच्या रसापासून गूळ तयार करण्यास परवानगी देण्यांत आली. अनेक अडचणींमुळें प्रत्यक्ष शिक्षणाचें कार्य जरी आठ दिवसच झालें तरी लोकमत ताडी-माडीविरुद्ध तयार करून गुळाचा उपयोग करण्याकडे वळवण्यास याचा बराच उपयोग झाला. प्राथमिक शाळा शिक्षकांनीं या प्रचार कार्यांत भाग घेतला. तसेंच त्यांनीं आवश्यक तेवढें शिक्षणहि घेतलें.

दारुबंदीचा कायदा अंमलांत आल्यानंतर निरनिराळ्या शिंदीताडी-माडीच्या रसापासून गूळ व साखर तयार करण्याकरितां बोर्डी येथें एक प्रयोगशाळा उघडण्यांत आली. तेथें गूळ तयार करण्यापासून तो विकला जाईतोंपर्यंत उपस्थित होणाऱ्या सर्व प्रश्नांचा विचार व उहापोह करण्यांत येऊन एकंदर योजना धंद्याच्या दृष्टीनें यशस्वी होते कीं नाहीं हें ठरविण्याचा प्रयत्न करण्यांत आला. सर्पणाचा खर्च कमी केल्याशिवाय गुळाची किंमत कमी करतां येणार नाहीं असें आढळलें. त्या दृष्टीनें प्रयत्न चालू असून त्यांत यशहि येत आहे. नीरेपासून केलेला गूळ बाजारांत निषिद्ध मानतात, हें लोकमत बदलण्यास प्रचाराची आवश्यकता आहे.

या धंद्यांत काम करणाऱ्याचें सर्वसाधारण मासिक उत्पन्न रु. १० होतें. घरांतील माणसांनींच मदत केली, सर्पण जमा केलें तर उत्पन्नाचा आकडा दरमहा रु. २० वरहि जाईल. धंद्यास रु. १० ची सामुग्री लागते.

**गांधीसेवा संघ**

या संघाच्या विद्यमानें मुंबईत उत्पादन व प्रदर्शन केंद्र स्थापन करण्यांत आलें. त्याचा उद्देश असा कीं प्रत्यक्ष उत्पादन करून त्याला धंद्याचें स्वरूप देऊन त्या दृष्टीनें तें यशस्वी करून दाखवावयाचें, तसेंच सामान्य जनतेस उदाहरणानें शिक्षण द्यावयाचें. ह्या कार्याकरितां सौ. कॅप्टन यांच्या नेतृत्वाखाली मुंबईच्या उपनगरांत सुरवात करण्यांत आली. तेथें तेलाच्या घाणी, चाकी, भात सडणें, गूळ तयार करणें व मधमाशा पाळणें याबद्दल शिक्षण देण्याची व्यवस्था करण्यांत यावयाची होती; परंतु आर्थिक टंचाईमुळें मुंबई सरकारनें ऐनवेळीं ठरवलेली मदत कमी केली; त्यांतच पावसाळा सुरू झाला. गुजराथ-काठेवाड मधील दुष्काळामुळें कडबा वगैरेंच्या किंमती ६०% चढल्या, अशा परिस्थितींत योजिलेलें कार्य झालें नाहीं. तथापि एक गोष्ट सिद्ध झाली, ती अशी कीं तेलाची एक घाणी फायदेशीर नाहीं. दोन घाण्या तरी चालविणें आवश्यक आहे.

वरील सर्व प्रयत्न चालू असतां त्यांच्या उपयुक्ततेचें ज्ञान इतर लोकांना होण्याच्या उद्देशानें लहान लहान पुस्तकें, पत्रकें छापण्यांत आलीं. श्री. बालुभाई मेहता यांचें " आहारमीमांसा " चें गुजराथी व कानडी भाषांतर करण्यांत आलें. श्री. झवेरभाई पटेल यांचें " तेल माळणें " पत्रकाचें मराठी व कानडी भाषांतर प्रसिद्ध झालें. श्री. कल्लापूर यांचें "काथ्याचा धंदा" हें पत्रक कानडींत प्रसिद्ध करण्यांत आलें. एकूण छपाईवर रु. ५२९-९ खर्च करण्यांत आला.

## निवडक बाजारभाव

बँक रेट (२८ नोव्हेंबर, १९३५ पासून) ... ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% करमाफ लोन (१९४५–५५) ... ... | १०९—० |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०३—८ |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ८९—० |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १००—२ |
| ३% (१९६३–६५) ... ... ... | ८६–१० |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | ९४—४ |
| ४% पोर्ट ट्रस्ट (लांब मुदत) ... | ९९—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल (लांब मुदत) ... ... | ९९—० |
| ५% म्हैसूर कर्ज (१९५३–६३) ... ... | १०६—० |
| ५% म्हैसूर कर्ज (१९५५) ... ... | ११८—० |

### मंडळ्यांचे भाग

(कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००–५०) ११% ... ... | १३२—८ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | ९२—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया (५०—२५) ८% ... | ३४–१० |
| इंपिरिअल बँक (५००) १२% ... ... | १४४०—० |
| बाँबे प्रॉ. को. बँक (५०) ४% ... ... | ५३—० |
| रिझर्व्ह बँक (१००) ३½% ... ... | १००–१२ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें (मिंट) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४०–११–० |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ६३—०—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. (५०) १३% ... ... | १२५–१२ |
| कराची (१००) ९% ... ... ... | १९५—० |
| पुणें इलेक्ट्रिक (१००) ९% ... ... | १८२—२ |
| टाटा पॉवर ऑर्डि. (१०००) ५½% ... ... | १३०५—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. (१०००) ७½% ... ... | १४६५—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती (१००) ४¾% ... ... | ९५—८ |
| पाचोरा–जामनेर (१००) २% ... ... | ६४—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | १०१०—० |
| तापी व्हॅली (५००) ८½% ... ... ... | ७७८–१२ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर (५०) ७ रु. ... ... ... | २०६—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट (१००–५०) २ रु. ... ... | ४४—८ |
| सिंधिया स्टीम (१५) १ रु. ... ... ... | १९—८ |
| न्यू इंडिया विमा (७५–१५) १ रु. ... | ३८—० |
| ओरिएंटल विमा (२००) १२५ रु. ... | ३४८०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. (१५०) ६% ... ... | २०५–१० |
| टाटा आयर्न दु. प्रे. (१००) १८ रु. ४० आ. ... | १४८—८ |
| टाटा आयर्न ऑर्डि. (७५) १५ रु. ... ... | ३५८—० |
| टाटा आयर्न डिफर्ड (३०) ७५ रु. ११ आ. ३ पै. ... | १८८०—० |
| असोसिएटेड सिमेंट (१००) ५ रु. ... | ११४—८ |


स्पृहणीय यश

बोनसचे दरांत २० टक्के वाढ

तारीख ३० एप्रिल १९३८ रोजीं झालेल्या मूल्यमापनाचा निकाल.

| हयातीनंतरचे विम्यावर | त्रैवार्षिक–दर हजारीं बोनस | हयातींतील विम्यावर |
|---|---|---|
| रु. ५४ | | रु. ४५ |

आजच "कॉमनवेल्थ" ची पॉलिसी घेऊन कंपनीचे उत्कर्षांत भागीदार व्हा.

दि कॉमनवेल्थ अॅशुअरन्स कंपनी लि० पुणें

लिहा अगर समक्ष भेटा.

श्री. रा. न. अभ्यंकर, बी. ए., एलएल. बी. मॅनेजिंग एजंट.

सर्वत्र कार्यक्षम व विश्वासू एजन्ट आकर्षक अटींवर नेमणें आहेत.

बंगला विकणें आहे! आधुनिक सुखसोयींनीं सुसज्ज असा, दरसाल ३०० तीनशें रु. भाडें येणारा नुकताच बांधलेला कराड येथील बंगला विकणें आहे। किंमत फक्त ५००० रु. पैसे गुंतविणारांना अमूल्य संधि। विशेष माहितीपत्रकासाठीं पोस्टाचें ०१ एक आण्याचें तिकिट ठेवून पत्रव्यवहार करावा.

पत्ताः—डी. बी. जोशी, मोटार प्रोप्रायटर. मु० पो० कऱ्हाड, जि० सातारा.

मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ६

— मागविण्याचा पत्ता —

मॅनेजिंग डायरेक्टर, रुरल प्रॉडक्टस कंपनी लिमिटेड ९२३ ए, सदाशिव, पुणें २.

बँका आणि त्यांचे व्यवहार

दुसरी ताजी आवृत्ति प्रसिद्ध झाली.

किं. १ रु. ८ आणे

१ रु. १० आ. ६ पै चीं तिकिटें पाठवून मागणी करा.

: लेखक :

प्रो. वा. गो. काळे ◆ श्री. श्री. वा. काळे

बँकिंगविषयक प्रश्नांचें विवेचन करणारें अत्यंत उपयुक्त पुस्तक

"अर्थ" ग्रन्थमाला, : : पुणें ४.




एजंटः—
महादेव गोविंद कुलकर्णी
किराणा व भुसार मालाचे व्यापारी
७८६ सदाशिव, पुणें शहर.

PARADKAR TAILORING ACADEMY POONA

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
**जर्निमन टेलर व्हा.**
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यांस
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
**पराडकर टेलर्स ॲकेडिमी,** ६७२ सदाशिव, पुणें.

चेअरमन,
व्ही. एन. पाटील, एस्क्वायर,
एम. ए. (कँटब), बार-ॲट-लॉ,
माजी एम. एल. सी.

मॅनेजिंग एजंट,
पी. आय. पाटील अँड सन्स

पंचवार्षिक बोनस
तहाहयात रु. ६० दर हजारी हयातींत रु. ५०

प्रगतीच्या पथावर असलेली
दि
**ग्रेट सोशल लाईफ अॅण्ड जनरल ॲशुरन्स लिमिटेड.**
हेड ऑफिस—जळगांव, पू. खा.
एजन्सीकरितां आजच लिहा.
ब्रँच ऑफिस—लक्ष्मीरोड, पुणें.

पूर्ण स्वदेशी
कमी प्रिमियम, जास्त नफा,
विमेदारांस अत्यल्प हप्त्यांत
भरपूर सवलती
आधुनिक शास्त्रशुद्ध विम्याच्या उपयुक्त
विविध योजना. सविस्तर माहिती मागवा.

के. जी. चौधरी,
लाईफ मॅनेजर.

के. एच. सुराणा विमा केसरी,
जनरल मॅनेजर.

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन
स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

# महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनी छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनी 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.